Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

Vol. ( I )

12 January 2019

SPECIAL ISSUE – 92

# महिला सबलीकरणाच्या समस्या : आव्हाने आणि उपाय

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editor of This Issue**
**Prof. A.R. Bhosle**
Assist. Prof. Head of Dept. Sociology
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

**Dr. S.K. Gaike**
Assist. Prof. Dept. of Sociology
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net
© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 400/-

Scanned with Oken Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 36. | आदिवासी स्त्री जीवन : प्रश्न समस्या एक अध्ययन | के.बी. फोले, डॉ.भिसे आर.एम. | 100 |
| 37. | **साहित्य समाज और नारी** | **प्रा.बोडखे एच.डी.** | 104 |
| 38. | स्त्रियांप्रती हिंसाचार : एक सार्वदेशिक आजार | प्रा.डॉ.आनेराव एम.एम. | 106 |
| 39. | कुटूंब संस्थेतील एक नवा विचार प्रवाह - सारोगेट मदर | प्रा.मुठ्ठे पी.आर. | 109 |
| 40. | महिला सबलीकरण : समस्या, आव्हाने आणि उपाय | अंबुरे ऋषिकेश सर्जेराव | 111 |
| 41. | भारतातील लिंग गुणोत्तर विषमता | डॉ.सुरेश सामाले | 114 |
| 42. | भारतातील महिला अत्याचार आणि उपाय | प्रा.सुनिता जगन्नाथ कुकडे | 117 |
| 43. | बंजारा : साहित्य, संस्कृती आणि स्त्री | प्रा.डॉ.एल.एस.पवार | 121 |
| 44. | कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायद्याची उपयुक्तता (2005) | **डॉ. देशमुख एम. बी.** | 124 |
| 45. | स्त्रियावरील कौटुंबिक अत्याचार | प्रा.मगर पांडुरंग किसनराव | 126 |
| 46. | हुंडा प्रथेचा भारतीय समाजावर झालेला परिणाम :एक समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा.डॉ.चंद्रशेखर एस. पाटील | 129 |
| 47. | कौटुंबीक हिंसाचार आणि स्त्रिया | प्रा. तांदळे सुरेंद्र सुंदरराव | 132 |
| 48. | साहित्य, समाज और स्त्री | डॉ. पवार विक्रमसिंह विजयसिंह | 134 |
| 49. | कौटुंबिक हिंसाचार आणि स्त्रिया | प्रा.गायकवाड पी.के. | 136 |
| 50. | कौटुंबिक हिंसाचार कायदा २००५ आणि स्त्री | प्रा. गायकवाड डी.डी. | 138 |
| 51. | सामाजिक चळवळीतील स्त्रियांचे योगदान | डॉ. संधीपान गायके, डॉ. तंगलवाड डी.एम. | 141 |
| 52. | हुंडा प्रथा, समाज आणि स्त्रिया | डॉ. बी. एल. म्हस्के | 145 |
| 53. | कौटुंबिक हिंसाचार आणि स्त्रिया | प्रा. राठोड बी.जे. | 148 |
| 54. | महिला सबलीकरणाच्या दृष्टीने दलित महिला आणि मानवी हक्क | प्रा.संदिप कोरडे | 150 |
| 55. | महिला चळवळ आणि स्त्रिया | प्रा.डॉ. लक्ष्मण गीते | 152 |
| 56. | महिला चळवळ आणि स्त्रिया | प्रा. आर.डी.खताळ | 155 |
| 57. | लिंगभाव विषमता आणि स्त्रिया | प्रा. प्रकाश साहेबराव काळवणे | 157 |
| 58. | स्त्रियांच्या सामाजिक, राजकीय चळवळी आणि महिला सबलीकरण | डॉ. विठ्ठल भिमराव मातकर | 160 |
| 59. | महिलेविरूद्ध अत्याचार व उपाय | प्रा.कु. मुंडे ज्योती ज्ञानोबा | 164 |
| 60. | कौटुंबिक हिंसाचार कायदा आणि स्त्रिया | प्रा. डॉ. रजनी बोरोळे | 168 |
| 61. | कौटुबिक कायदे आणि स्त्रियांचा बदलता सामाजिक दर्जा | प्रा. पोकळे एस.एम. | 170 |
| 62. | भारतीय समाजातील हुंडा प्रथा:एक समाजशास्त्रीय अध्ययन | प्रा.ए.आर भोसले | 172 |
| 63. | लिंगभावना विषमता आणि भारतीय स्त्रीया | प्रा.डॉ.नागोराव संभाजी भुरके | 174 |
| 64. | महिलांच्या विकासाची वादळवाट : कायदे आणि सामाजिक दृष्टीकोण | प्रा.विलास सोमाजी पवार | 176 |
| 65. | मराठी कादंबरीत सहकारी साखर कारखान्यातील स्त्रीयांचे चित्रण: | प्रा. विनायक जाधव | 179 |
| 66. | हुंडा प्रथा : समाज आणि स्त्रीया | प्रा. उगीले माधव उत्तमराव | 182 |
| 67. | **महिला शिक्षिकांचा भूमिका संघर्ष व त्याचे परीणाम** | **प्राचार्य डॉ. राम वाघ , गोविंद द. बावस्कर** | 185 |
| 68. | महिला सबलीकरण : स्वरूप व उद्दिष्ट्ये | प्रा. डॉ. साईनाथ राधेशाम बनसोडे | 188 |
| 69. | कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा 2005 आणि स्त्रियांपुढील आव्हाने | प्रो.श्रीमती इंदू चंद्रकांत साळुंके | 190 |




Scanned with Oken Scanner

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676
Special Issue -92 , महिला सबलीकरणच्या समस्या : आव्हाने आणि उपाय | January 2019 | UGC Approved No. 40705

# आदिवासी स्त्री जीवन : प्रश्न समस्या एक अध्ययन

**के.बी. फोले**
**डॉ.भिसे आर.एम.**

---

**प्रस्तावना :**

भारतीय समाजव्यवस्थेत सर्वच क्षेत्रात स्त्रियांना दुय्यम थान दिले जाते व त्यामुळे ज्या आजवर संधिवंचित, सत्तावंचित व प्रतिष्ठावंचित राहिलेल्या आहेत. स्वातंत्र्यानंतर गेल्या सत्तर वर्षात त्यामध्ये काही प्रमाणात बदल झालेला दिसतो आहे. महिला विविध क्षेत्रात प्रवेश करताना दिसत आहेत. परंतु हे प्रमाण समर्पक नाही. काही क्षेत्रात त्यांची स्थिती नगण्य, अल्प किंवा नाममात्रच आहे.

भारतीय स्त्रीच नव्हे तर जगातील प्रत्येक स्त्री वेगवेगळ्या कारणांनी गुलामगिरीत ढकलल्या गेली. ती धर्मव्यवस्थेचा, पुरूषी व्यवस्थेचा बळी ठरली. स्त्री-पुरूष असमानतेच्या खाईत ती बरबाद झाली. अनेक असामाजिक बंधनात दुय्यम दर्जाचे जीवन तिच्यावर लादण्यात आले. धर्मग्रंथात तर तिला अग्नीपरीक्षा, जंगलात जाण्याची शिक्षा, जुगाराच्या डावावर तिची हार, तिचे वस्त्रहरण अशा असामाजिक प्रसंगात ढकलून देण्यात आले. हजारो वर्षांपासून प्रस्थापित व्यवस्थेने स्त्रियांना दिलेला दुय्यम स्थानाचा शिक्का तिच्या कपाळावर मारला गेला. त्याचे परिणाम आजतागायत तिला भोगावे लागत आहेत.

भारतीय समाजातील स्त्रियांचा दर्जा वर्णभेद, लिंगभेद, जातिभेद यानुसारच निश्चित होतो. स्त्री कोणत्याही जातिसमूहातील असली तरी तिला प्राप्त होणारा दर्जा हा कनिष्ठच होता. जातीच्या श्रेणीरचनेनुसार प्रत्येक जातीला मिळणारा दर्जा हा वेगळा होता. त्यामुळे कनिष्ठ जातीतील स्त्रियांचा दर्जा हा आणखी दुय्यम व कनिष्ठ स्वरूपाचा होता. परंतु आदिवासी स्त्रीयांच्या बाबतीत विचार केला तर तिच्या पाठीमागे आदिम संस्कृतीचे अधिष्ठान असल्यामुळे आदिवासी समाजात तिला मानपान असल्याचे दिसून येते. आदिवासी संस्कृती स्त्रियांचा आदर करणारी असल्यामुळे इतर समाजाला स्त्री गुलामीचे जे भयानक स्थान तिच्या वाट्याला आले ते आदिवासी स्त्रियांच्या वाट्याला आले नाही.

आदिम संस्कृतीचे मात्र जंगल पहाडात राहणाऱ्या स्त्रीला समानतेचा दर्जा दिलेला दिसून येतो.[1] असे जरी असले तरी माणसाळलेल्या आधुनिक युगात जंगलातून प्रगत प्रवाहाबरोबर आदिवासीचा संबंध आला आणि हळूहळू स्त्री गुलमीची त्याला सवय झाली. आदिवासींची मातृसत्ताक पद्धत म्हणजेच स्त्रियांचे सामर्थ्य दर्शविणारी पद्धत होय.

**समस्या अध्ययनाचे महत्त्व :**

किनवट तालुक्यासारख्या अतिदुर्गम भागात वास्तव्यास असलेल्या आदिवासी स्त्रीला मुख्य प्रवाहात कसे आणता येईल ? या समाजातील स्त्रियांना भेडसावणाऱ्या समस्या कशा जाणून घेता येतील ? व त्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने कोणते उपाय करता येतील ? या सर्व बाबींचा अनेकविध अंगाने अभ्यास करणे हा या अध्ययनाचा प्रमुख उद्देश आहे.

आदिवासी स्त्रियांच्या सामाजिक तथा आर्थिक समस्यांचा अभ्यास व त्यातून येणारे संभाव्य निष्कर्ष यातून संपूर्ण आदिवासी स्त्रियांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय जीवनाचे विविध पैलू समजून घेण्यास मदत होते.

आदिवासी स्त्रियाचे कौटुंबिक जीवन, त्यांच्या गरजा, त्यांना दिली जाणारी वागणूक, त्यांचा कौटुंबिक व सामाजिक दर्जा व त्यांची विविध प्रसंगानुसार बदलती भूमिका या सर्व बाबींचा अभाव करून आदिवासी स्त्रियांचे जीवन जवळून जाणून घेता येते.

अशा प्रकारे प्रस्तुत अध्ययनातून येणारे निष्कर्ष व त्यावर केली जावू शकेल अशी उपाययोजना सुचविता यावी यासाठी हे अध्ययन नक्कीच उपयुक्त ठरेल, यात शंका नाही.

**अध्ययनाची उद्दिष्टचे :**

1) आदिवासी स्त्रियांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व धार्मिक जीवनाचा अभ्यास करणे.
2) आदिवासी स्त्रियांचे प्रश्न व समस्या स्पष्ट करणे व त्याबाबत उपाययोजना सूचविणे.

**गृहितके :**

1) आदिवासी स्त्रियांना दारिद्र्यामुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.
2) आदिवासी स्त्रिया सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या असल्या तरीही या समाजातील स्त्रियांचा दर्जा मात्र श्रेष्ठ आहे.

**स्त्रियांची सामाजिक स्थिती :**

आपल्या देशात गुलामगिरीच्या बेड्यात स्थानबद्ध झालेल्या महिलेच्या अंगावर संस्कृतीचे पांघरूण घालण्याच्या नावावर तिचे श्वास कैद करण्यात आले. पुरूष व्यवस्थेची दासी म्हणून तिच्याकडे पाहण्यात आले. निर्णय प्रक्रियेत तिला दुय्यम स्थान देण्यात आले. स्त्रियांचे स्वातंत्र्य सामाजिक रूढी, परंपरा, धर्मव्यवस्था यात बंदिस्त झाले. चार भिंतीच्या आत ती नजरकैद करण्यात आली.एवढेच नव्हे तर तिच्यावर लक्ष ठेवण्यासाठी तिच्या पायात घुंगराच्या आवाजाच्या फिरताना नाद करणाऱ्या तोरड्या अलंकार म्हणून बेड्यासारख्या आवळल्या गेल्या. हुंडा घेवून अत्याचार सुरू केला. पुरूषी वर्चस्वाखाली तिला मारहाण करणे, पहिली पत्नी जिवंत असताना दुसरे लग्न करणे, मुलगा होत नाही म्हणून छळ करणे. गर्भजल तपासणी करून मुलगी होत असल्यास तिची भ्रूणहत्या करणे, नोकरीत, समाजात वावरण्यास मज्जाव करणे, देवदासीच्या अनिष्ट प्रथेत रूढीच्या नावाखाली तिला देवाला सोडणे, लैंगिक अत्याचार, बलात्कार आई-वडीलांच्या संपत्तीत वाटा न

**RESEARCH JOURNEY** International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | January 2019 | UGC Approved No. 40705
Special Issue -92 , महिला सबलीकरणच्या समस्या : आव्हाने आणि उपाय

देणे, अशा असंख्य अन्याय अत्याचाराची स्त्री बळी ठरत आहे. सामाजिक समतेच्या वाट्यात तिला मुक्तपणे वावरता येत नाही. तिचे स्वातंत्र्य वेगवेगळ्या कारणांनी जोखडबंद झाले.

आज काळ बदलला. कायद्याने तिला स्वातंत्र्य दिले. तरीदेखील तिची दुरावस्था थांबलेली नाही आजही तिचा छळ आडपडद्याआड तर कुठे खुलेआम सुरूच आहे. निरनिराळ्या कष्टकरी वंचित समाजाच्या स्त्रिया आजही आपल्या कुटुंबाचा भार वाहतांना दिसतात. आदिवासी स्त्री ही तर तिच्या कुटुंबातील मजबूत आर्थिक कणा आहे. तिच्या कष्टावर कुटुंबाची गुजराण, देखभाल होते. रात्रंदिवस कष्ट केल्यानंतरही नवरेपणाचा हक्क सांगून दारूसाठी तिचेच पैसे पळविणारे पुरूषी, अहंकारी, कष्ट करणाऱ्या आपल्या पत्नीलाही समजू शकत नाहीत. पायातील वहाण समजून तिचे शोषण चालूच आहे.

विकृत मनोवृत्तीचे हे विचार नेमके कोणी दिले ? स्त्रियांकडे एक उपभोगाची वस्तू या नजरेनेच पाहिल्या गेले. राजवाड्यातील रंगमहल, अप्सरांचा नाच, वेशांचे अड्डे, बारबाला हे सारे कोठून आले? कोणी दिले ? याचे निर्माते कोण ? अय्याशी प्रवृत्तीने स्त्रीकडे उपभोग्य नजरेतून पाहिले. अनेक स्त्रियांचे संसार बरबाद झाले. समाजातून जन्म घेतलेल्या स्त्रिया विघातक प्रकृतीने पुढे आणल्या. देवाच्या नावावर देवदासी बनवून तिचा जन्म शारीरिक उपभोगासाठी वाया घातला आणि त्यांच्या जीवनात अनेक प्रश्न निर्माण केले. यातूनच कुमारी मातेचा प्रश्न निर्माण झाला व अशा कुमारी मातेपासून जन्मलेल्या निराधार बालकांचा प्रश्न पुढे आला.

अखेर हा दोष कुणाचा आहे ? स्त्री सुरक्षित ठेवण्याची जबावदारी कुणाची ? आजही परप्रांतात मुलींची विक्री सर्रास होत असल्याचे गुन्हे उघडकीस येतात. स्त्रियांचे शोषण, बलात्कार, वेठबिगारी, भ्रुणहत्या हुंडाबळी इत्यादी समस्येत स्त्री गुरफटलेली दिसून येते. त्यामुळेच स्त्री म्हणून तिचे असंख्य प्रश्न समोर आलेले आपणास दिसून येतात.

**आदिवासी व आदिवासेत्तर स्त्रिया :**

**आदिवासेत्तर स्त्रिया :** भारतीय समाजव्यवस्थेचा विचार करीत असताना ठळकपणे एक गोष्ट आपल्या लक्षात येते ती ही की, हिन्दू समाजात स्त्रीला नगण्य स्थान आहे. हिंदू संस्कृती ही पुरूषप्रधान आहे हे जगजाहीर आहे. आज हिंदू स्त्रीला जी काही प्रतिष्ठा मिळाली त्याचे पहिले श्रेय भारताचे थोर सुपूत्र म.ज्योतीराव फुले यांना जाते. नंतर स्त्री प्रतिष्ठेला संवैधानिक अधिष्ठान देण्याचे महान कार्य भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले आहे.

हिंदू स्त्रिची अवहेलना ही एका विशिष्ट कालखंडात झाली नसून ती वैदिक काळापासून आजतागायत सुरूच आहे. स्त्री ही केवळ उपभोग्य वस्तू आहे, तिचे कार्यक्षेत्र फक्त संतती निर्मिती व पाकशास्त्र यांच्या पलिकडे विस्तारता कामा नये, असा आदेशच हिंदू धर्म शास्त्रांनी देवून ठेवला. स्त्रीच्या कार्यक्षेत्राच्या मर्यादा निश्चित करून तिच्या सृजनशक्तीला नासविण्याचे काम येथील पुरूषी संस्कृतीने केले. तद्वतच तिचे कुटुंबातील स्थानसुद्धा नगण्य असेच होते. तिल कुटुंबातल्या कोणत्याही निर्णय प्रक्रियेत भाग घेण्याची मुभा नव्हती. तिचे स्वातंत्र्य पूर्णपणे हिरावून घेण्यात आले होते. स्त्रीच्या जन्मापासून तिच्या मृत्यूपर्यंत तिची भयंकर निंदा करण्यात आली आहे. रजस्वला सारख्या निसर्ग धर्मासंबंधी देखील तिच्याबद्दल खूप काही बोलण्यात आले. डॉ.आ.ह.साळुंखेंनी 'हिंदू संस्कृती आणि स्त्री' या आपल्या ग्रंथात पृष्ठ क्रमांक 46 वर पाराशर मुनीचे म्हणणे उद्धृत केले आहे ते असे; जर एखाद्याने आपली मुलगी बारा वर्षाची होऊनही तिचे लग्न केले नाही, तर त्याच्या पितरांना दरमहा तिचे विटाळाचे रक्त प्यावे लागते.[2] रजस्वला झालेली अविवाहीत मुलगी पहिली असता तिचे आईवडील आणि थोरला भाऊ नरकाला जातो इत्यादी तसेच स्त्रिची निंदा करणारे शेकडो उदाहरणे हिंदू शास्त्रात सापडतात. तसेच देवसासीप्रथा, सतीप्रथा अशा अतिशय क्रुर व माणुसकीला काळीमा फासणाऱ्या प्रथा देखील याच पुरूष प्रधान संस्कृतीचा विकृत नमुना आहे.

आजच्या विज्ञान, तंत्रज्ञान आणि संगणकाच्या युगातसुद्धा विधवा विवाह, पुर्नविवाह, हुंडापद्धती, देवदासी, सती, लैंगिक अत्याचार स्त्री-भ्रूणहत्या, विकासाच्या क्षेत्रातील असमान संधी, रोजगारातील असमानता आणि असमान वेतन, कामाच्या ठिकाणी होणारे स्त्रियांचे शोषण अशा अनेक समस्यांना हिंदू स्त्रीला सामोरे जावे लागत आहे.

**आदिवासी स्त्री :**

आदिवासी स्त्रीच्या संदर्भात विचार केल्यास, अगदी प्राचिन ते अर्वाचिन अशा कुठल्याही कालखंडातील आदिम समाजरचनेचे बारकाईने अवलोकन केले असता, एक गोष्ट ठळकपणे लक्षात येते ती म्हणजे, आदिवासी स्त्री ही पूर्णतः स्वतंत्र आणि स्वायत्त होती. तिला कुटुंबाच्या सर्वच निर्णय प्रक्रियेत मानाचे व अग्रगण्य स्थान होते. तिच्यात व पुरूषात कुठलाच भेद करण्यात आला नव्हता. किंबहुना पुरूषापेक्षा स्त्रीचेच महत्तव अधिक होते.

आदिवासी स्त्री आदिवासींच्या कुटुंबातील कुटुंबप्रमुख असून ती आपल्या कुटुंबाचा आर्थिक कणा मानली जाते. याचाच अर्थ ती स्वकर्तृत्वावर उभी असून कुटुंबात तिचे महत्त्वाचे स्थान आहे हे दिसून येते. सर्वच आदिवासी जमातीत मातृसत्ताक कुटुंब पद्धती होती आणि ही मातृसत्ताक पद्धतच स्त्रियांचे सामर्थ्य दर्शविणारी पद्धत होय.

स्त्री हीच विश्वाच्या निर्मितीचे मूळ आहे, म्हणजेच सृजनाचे प्रतिक आहे अशी दृढ श्रद्धा आदिवासी समाजात स्त्रीचा सन्मानच होतो. ... जन्म पवित्र मानला जातो. आदिवासींचा गुलामीचा इतिहास नाही.[3] आदिवासी समाजात सतीप्रथा अजिबात बघायला मिळत नाही.[4] ... संबंधी देखील आदिवासींमध्ये चांगली प्रथा आहे, ज्याला 'काडीमोड' म्हणतात. इतर समाजाप्रमाणे कोर्टकचेरीच्या फंदात पडून नसते ... जविता सरळ सरळ जगात पंचायतीद्वारे प्रकरण निकाली काढल्या जाते. आदिवासी स्त्रीला पुर्नविवाहाचा अधिकार आहे. ... आदिवासी स्त्री व हिंदू स्त्री यांच्या जीवन जगण्याच्या पद्धतीत खूप तफावत असल्याचे दिसून येते. असे असले तरीही पुढे मात्र ... खूप बदल झाल्याचे दिसून येतं.

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676
Special Issue -92 , महिला सबलीकरणच्या समस्या : आव्हाने आणि उपाय | January 2019 | UGC Approved No. 40705

**आदिवासी स्त्री; सद्यस्थिती :**

1857 च्या पूर्वी स्त्रियांना शुद्र समजून गुलामगिरीत जखडून ठेवले होते. तिच्यावर सामाजिक गुलामगिरी लादून तिला बंदिस्त केले. या व्यवस्थेच्या विरोधात स्त्रियांच्या स्वातंत्र्यासाठी नारी सन्मानासाठी आदिवासींनी विद्रोह करून आंदोलन केले.[5] जंगलात गडप झालेल्या आदिवासी माणसाला स्त्री स्वातंत्र्य विचाराणी जाण आदिवासी संस्कृतीने दिली. तरीदेखील बाहेरच्या प्रस्थापित व्यवस्थेच्या असामाजिक तत्त्वांचा त्रास आदिवासींना होवू लागला. त्यांच्या मुक्त व्यवस्थेवर अकारण गुलामीचे पाश आवळल्या जावू लागले. त्यामुळेच आदिमांच्या जंगल व्यवस्थेतून प्रतिकार करण्यासाठी विद्रोहाचे धूर पेटू लागले. आदिवासींना या गुलामीची जाण होवून त्यातून मुक्तता करण्यासाठी तो धडपडू लागला व यातून क्रांतीच्या ज्वाला भडकू लागल्या.

खरे पाहता आदिवासींचा गुलामीचा इतिहास आर्यांनी जंगलात पिटाळल्यानंतर ते स्वतंत्र जीवन जगू लागले. त्या ठिकाणीही इंग्रजांचे कायदे, भांडवलदारी, इराजदारी व्यवस्था पोहोचली आणि त्यांच्या मुक्त जीवनात परिवर्तन होवू लागली. चातुर्वर्ण्य व्यवस्थेने स्त्रियांना गुलाम बनविले. त्याचे चौफेर परिणाम होऊ लागले. अशाही अवस्थेत आदिम संस्कृती स्त्रियांच्या बाजूने उभी होती. तिच्या श्रमाचे, दारिद्र्य, परिस्थितीचा फायदा घेवून तिचे शोषण होवू लागले. कुमारी मातेचा प्रश्न आज उदयास आलेला दिसतो. पुंजीवादी लोकांनी मायबहीणीच्या इज्जतीवर टाकलेला डाका आदर्श संस्कृतीला पायदळी तुडविणारा ठरला. अशाही इज्जत जोपासणाऱ्या आदिवासी स्त्रिया पिपासूंच्या पोटात कोयता खूपसून ठाण्यात रक्ताने माखलेला कोयता घेवून जातात. तेव्हा त्यांच्या आदर्श संस्कृतीचा जाहीरनामा वृत्तपत्रात झळकतो.

कुटुंबात स्त्रियांना मानाचे स्थान निश्चितच आहे. आदिवासी संस्कृतीची महानता पाठीशी असलेली आदिवासी स्त्री विचारांनी मात्र ..धीच मागास नव्हती आणि आजही नाही. मात्र तिची थोडीशी कुचंबना झाली, ती केवळ तिच्या आर्थिक दौर्बल्यामुळे.

आर्थिक स्थिती कमकुवत असल्याकारणाने आदिवासी स्त्रीची शिक्षणाच्या क्षेत्रात हवी तशी प्रगती झालेली दिसत नाही. परंतु सद्यस्थितीत मात्र बऱ्याच स्त्रिया आपल्या कर्तृत्वाची छाप विविध क्षेत्रात पदर्शित करताना दिसून येतात तद्वतच महिला आरक्षणाचा फायदा घेवून सरपंच, पंचायत, जिल्हा परिषदेत आदिवासी महिलांचे प्रतिनिधीत्व आढळून येत आहे. असे असले तरीही सक्षमपणे राजकीय क्षेत्रात आदिवासी महिलांनी सहभाग घेण्याची आवश्यकता आहे.

कुटुंब प्रमुख म्हणून ज्याप्रमाणे ती जबाबदारी सांभाळते, तशीच छाप राजकीय क्षेत्रात देखील सोडणे गरजेचे आहे. राज्यकर्त्या आदिवासी स्त्रियांनी या देशात आपला इतिहास लिहून ठेवलेलाच आहे. त्यांची परंपरा पुढेदेखील चालू ठेवणे गरजेचे आहे. रात्रंदिवस घाम गाळून जीवन जगणाऱ्या स्त्रिया मात्र आजही समस्येत जीवन जगत आहेत. याचे कारण आहे -

जंगलावरील निर्बंध, जमिनीची लूट, कुपोषण, विस्थापित ह्या सर्व वातावरणात आदिवासी स्त्रियांच्या जीवनात दारिद्र्य फैलावले, असे असले तरीही तिची जगण्याची धडपड मात्र चालूच आहे. परिस्थितीशी चार हात करीत ती आजही लढत आहे.

**आदिवासी स्त्रियांच्या समस्या**

**1) आर्थिक समस्या :**

1) अपुरे उत्पादन व त्यामुळे येणारे दारिद्र्य ही त्यांची प्रमुख आर्थिक समस्या आहे.
2) जंगल संपत्तीवर आधारित जीवन जगणाऱ्या महिलांचे जंगलावर सरकारचे स्वामित्व प्रस्थापित झाल्यामुळे त्यांचे उदरनिर्वाहाचे साधनच नाहीसे झाले.
3) जमीनदार, व्यापारी, ठेकेदार, सरकारी अधिकारी यांच्याकडून होणारे शोषण.
4) अर्धउपासमारीमुळे होणारे कुपोषण,
5) खाणी, कारखाने, वीजकेंद्रे, धरणे आदिंच्या निर्मितीमुळे होणारे विस्थापन,
6) भूमिहिनांचा प्रश्न, वेठबिगारी, आर्थिक शोषण व कर्जबाजारीपणा या आदिवासी महिलांच्या प्रमुख आर्थिक समस्या आहेत.

**2) सामाजिक व सांस्कृतिक समस्या :**

डोंगर, दऱ्या, घनदाट जंगले आदि दुर्गम ठिकाणी राहणाऱ्या जमातींचा बाह्यजगाशी संपर्क तुटल्यामुळे त्यांच्यात अनेक समस्या निर्माण झाल्या. तसेच बाह्यजगाशी संपर्क आल्यामुळे देखील अनेक सामाजिक समस्या निर्माण झाल्या.

उदा. 1) वधुमूल्याची प्रथा, 2) बालविवाह, 3) स्त्रीयांना मिळणारे दुय्यम स्थान इ.[6]

**3) राजकीय समस्या :**

...जमातीच्या हितसंबंधाचे रक्षण करून आधुनिक काळानुसार आवश्यक असणारे परिवर्तन त्यांच्यामध्ये घडवून आणणारे राजकीय ...न लाभल्यामुळे विकासाची गती मंदावली.

**...आरोग्यविषयक समस्या :**

...पोषणाचा प्रश्न, 2) शुद्ध पेयजलाची समस्या, 3) साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव ..., 4) बालमृत्यू, 5) मातामृत्यूचे प्रमाण अधिक, 6) स्वच्छतेकडे दुर्लक्ष झाल्यामुळे चर्मरोगाचे प्रमाण लक्षणीय आहे., 7) ...जादूटोण्यावर विश्वास[7] इ.

**...समस्या :**



Scanned with Oken Scanner

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | January 2019 | UGC Approved No. 40705
Special Issue -92 , महिला सबलीकरणच्या समस्या : आव्हाने आणि उपाय

1) आदिवासी स्त्रियांची शिक्षणातील उदासिनता, 2) आदिवासी स्त्री शिक्षण प्रवाहापासून कोसो दूर राहिली कारण दुर्गम भागातील त्यांचे वास्तव्य. 3) दारिद्र्य व विस्थापनामुळे मुलींचे गळतीचे प्रमाण अधिक, 4) दुर्गम भागात जाण्याबद्दल शिक्षकांची उदासिनता इ.

6) **धार्मिक समस्या :** 1) आदिवासी स्त्रयांचा धर्मांतराचा प्रश्न, व 2) त्यातून उद्‌भवलेली फुटीर वृत्ती, 3) परंपरागत विश्वासाला तडा.

7) **सांस्कृतिक समस्या :**

1) सांस्कृतिक कलांचा ऱ्हास झाला.

अशा प्रकारे वरील सर्व प्रकारच्या समस्यांनी आदिवासी स्त्री ग्रासलेली दिसून येते.

**उपाययोजना :**

1) आदिवासी स्त्रियांना योग्य व पुरेशा प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.
2) शासनाच्या विविध योजनांचा लाभ योग्य लाभार्थ्यांनाच मिळाला पाहिजे.
3) भूमीहीन, शेतमजूर, कुपोषित, वेठबिगार अल्पभूधारक तसेच विस्थापित इ. सर्वांच्या प्रश्नांकडे गांभिर्याने लक्ष देणे.
4) एकंदरीत आर्थिक विकासाचा वेग वाढविणे.
5) आदिवासी स्त्रियांमध्ये सामाजिक जागृती निर्माण करणे.
6) आदिवासी स्त्रियांमधील राजकीय नेतृत्वास चालना देणे.
7) आदिवासी स्त्रियांना पुरेशा प्रमाणात आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देणे.
8) आदिवासी भागातील शैक्षणिक सुविधांचा दर्जा सुधारणे.
9) आदिवासींच्या सांस्कृतिक कलावैभवाचे जतन व संवर्धन करणे.

**निष्कर्ष :**

1) आदिवासी स्त्रियांना दारिद्र्यामुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.
2) आदिवासी स्त्रियांमध्ये शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प असून त्याचे कारण दैनंदिन घरकाम व शिक्षणाच्या अपुऱ्या सुविधा हे आहे.
3) आदिवासी स्त्रिया सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या असल्या तरीही या समाजातील स्त्रियांचा दर्जा श्रेष्ठ (पुरूषांच्या बरोबरीचा) आहे.

**संदर्भग्रंथसूची :**

1) मडावी बाबाराव, (2015), पारंग (स्मरणिका), 10 वे अखिल भारतीय आदिवासी साहित्य संमेलन, नांदेड, पृ.क्र.48.
2) सरकुंडे माधव, (2011), आदिवासी अस्मितेचा शोध, देवयानी प्रकाशन, पृ.84.
3) मडावी बाबाराव, (2015), पारंग (स्मरणिका), 10 वे अखिल भारतीय आदिवासी साहित्य संमेलन, नांदेड, पृ.क्र.48.
4) सरकुंडे माधव, (2011), आदिवासी अस्मितेचा शोध, देवयानी प्रकाशन, पृ.89.
5) मडावी बाबाराव, (2015), पारंग (स्मरणिका), 10 वे अखिल भारतीय आदिवासी साहित्य संमेलन, नांदेड, पृ.क्र.48.
6) लोटे रा.ज. (2004), 'भारतीय सामाजिक संरचना आणि सामाजिक समस्या,' पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, पृ.44.
7) देशमुख सुदर्शन (2007), 'आदिवासी समाजाचे दारिद्र्य', निर्मल प्रकाशन, नांदेड, पृ.70.

Scanned with Oken Scanner